अंतरी पेटवू ज्ञानज्योत

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## *श्रेणी/गुणवत्ता सुधार योजना*

ज्या विद्यार्थ्यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./एल.एल.बी./बी.ई./बी.आर्किटेक्ट/बी.लिब./ एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी./एम.सी.ए./एम.सी.एम./एम.एड./एम.लिब./एम.एस.डब्ल्यू.ही पदवी घेतली असेल व ज्यांना सदर पदवीची श्रेणी /गुणवत्ता सुधार करावयाची असेल अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अधिकार मंडळाने अध्यादेश 174 लागू केलेला आहे.

अध्यादेश 174 अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना श्रेणी/गुणवत्ता सुधार करावयाची आहे, त्यांना संबंधित अध्यादेशात व खाली नमूद केलेल्या नियमांच्या अधिन राहून, विद्यार्थ्याने नियमित विद्यार्थी म्हणून ज्या महाविद्यालयातून पदवी परीक्षा उत्तीर्ण केली आहे, त्या महाविद्यालयांच्या मा.प्राचार्यांमार्फत श्रेणी/गुणवत्ता सुधार योजनेसाठी नाव नोंदणी करता येईल.

### नाव नोंदणी करतेवेळी खाली दिल्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबतची नियमावली

1) वर नमूद केलेल्या पदवी/पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमविची पदवीधारण करणा-या विद्यार्थ्यांना श्रेणी /गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार कोणत्याही वेळी निर्धारीत मुदतीत एकावेळी एकाच वर्गाची नाव नोंदणी करण्याची संधी देण्यात येईल. तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत नांव नोंदणी केलेल्या अशा विद्यार्थ्यांना मात्र कोणत्याही पदव्युत्तर वर्गाकरीता प्रवेश घेता येणार नाही. मात्र श्रेणी सुधार योजनेची नोंदणी रद्द करुन प्रवेश घेता येईल.

2) नाव नोंदणी अर्ज विद्यापीठ कार्यालयात रु.40/- भरुन प्राप्त होऊ शकतील. सदरचे अर्ज टपालाने मागविल्यास टपाल खर्चापोटी रु.10/- असे एकूण रु.50 चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) मा. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचे नांवे काढून विद्यापीठाच्या प्रकाशन विभागास विनंती अर्जासोबत पाठविल्यास नाव नोंदणी अर्ज संबंधितांच्या पत्त्यावर टपालाने पाठविण्यात येईल.

3) श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणीसाठी एकदाच संधी देण्यात येईल. नांव नोंदणी शुल्क रु.250/- नाव नोंदणी अर्जासोबत जमा करणे आवश्यक आहे.

4) अध्यादेश 174 प्रमाणे श्रेणी /गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी संबंधित शैक्षणिक वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यातील 30 तारखेपर्यंत करणे आवश्यक राहील. त्यानंतर संबंधीत शैक्षणिक वर्षाच्या दि.25 जानेवारीपर्यत नाव नोंदणी शुल्क रु.250/- अधिक विलंब शुल्क रु.200/- भरुन नाव नोंदणी करता येईल.

5) विद्यार्थ्यास एकदाच नाव नोंदणी करता येईल व नाव नोंदणी प्रमाणे त्यास 3 वेळा [मार्च /एप्रिल मध्ये] परीक्षा देता येईल. अशा विद्यार्थ्यांना ऑक्टोबर/नोव्हेंबर मध्ये परीक्षा देण्याची सवलत नाही.

6) सदर योजने अंतर्गत सहभागी होणा-या विद्यार्थ्यांनी ज्या महाविद्यालयातून पदवी संपादन केली असेल त्याच महाविद्यालयाच्या मा.प्राचार्यांमार्फत सदरचे नाव नोंदणी अर्ज पाठविणे आवश्यक आहे. तसेच संबंधित महाविद्यालयाच्या मा.प्राचार्यांनी देखील अशा विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यापीठात पाठविणे बंधनकारक आहे. परस्पर आलेले नाव नोंदणी अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

7) कोणत्याही विद्यार्थ्यांस उमवि अंतर्गत पदवी घेतल्यानंतर फक्त 5 वर्षाच्या आतच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत नाव नोंदणी करता येईल. श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी तीन वर्षापर्यंत राहील. ह्या तीन वर्षामध्ये जर विद्यार्थ्यांची श्रेणी/गुणवत्ता सुधार झाली नाही किंवा सदर नाव नोंदणी रद्द केली तर अशा विद्यार्थ्यांना कोणत्याही कारणास्तव पुन्हा नव्याने श्रेणी गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करता येणार नाही.

8) नाव नोंदणी अर्जासोबतच प्रथम वेळेचा परीक्षा अर्ज भरणे आवश्यक आहे. परीक्षा अर्जाची किंमत रु.10/- राहील. परीक्षा शुल्क नियमित विद्यार्थ्यांसाठी विहित केलेल्या शुल्काच्या दुप्पट भरावे लागेल. मात्र नियमित विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्जाकरीता लागू असलेले विलंब शुल्काप्रमाणे 30 नोव्हेंबर नंतर आलेल्या परीक्षार्थीना विलंब शुल्क भरणे बंधनकारक राहील. परीक्षा अर्ज महाविद्यालयातून प्राप्त करता येतील. परीक्षा अर्जावर श्रेणी/गुणवत्ता सुधार असे नमूद करणे आवश्यक आहे.

. . . 2 . . .

नांव नोंदणी अर्जासोबत विद्यार्थ्याला ज्या वर्गाची श्रेणी/गुणवत्ता सुधार करावयाची आहे त्या वर्गाचे मूळ गुणपत्रक दोन प्रमाणित झेरॉक्स प्रतींसह विद्यापीठास सादर केले पाहिजे.

एकदा नाव नोंदणी केल्यानंतर पुढील वेळेस पुनःश्च परीक्षार्थींनी [रिपीटर विद्यार्थ्यांनी] महाविद्यालयात परीक्षा अर्ज भरण्याच्या मुदतीत दुप्पट परीक्षा शुल्कासह नियमीत विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाबरोबर परीक्षा अर्ज महाविद्यालयामार्फत पाठवावा. अर्ज करण्यास विलंब झाल्यास नियमित विद्यार्थ्यांसाठी लागू असलेले परीक्षा अर्ज महाविद्यालयामार्फत पाठवावे. अर्ज करण्यास विलंब झाल्यास नियमीत विद्यार्थ्यांसाठी लागू असलेल्या परीक्षा अर्जाचे विलंब शुल्क भरणे बंधनकारक राहील. परीक्षा अर्जासोबत श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत प्राप्त केलेल्या लेजरची प्रमाणित छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

9) अध्यादेशाप्रमाणे ज्या वर्गासाठी नाव नोंदणी करावयाची आहे त्यासाठी असणा-या एकूण लेखी पेपर्सच्या कमीतकमी 1/3 पेपर्सची नोंदणी करणे आवश्यक आहे. [जर दोन वर्ग मिळून श्रेणी देण्यात येत असेल तर दोन्ही वर्गाच्या पेपर्सपैंकी किमान 1/3 इतक्या पेपर्सची नोंदणी करणे आवश्यक आहे.] जे विषय नोंदणी अर्जात नमूद केलेले असतील, त्याच विषयांची परीक्षा श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत देता येईल. मात्र एकदा घेतलेले विषय कोणत्याही परीस्थितीत बदलता येणार नाहीत.

10) ज्या विषयांमध्ये विद्यापीठाची लेखी व प्रात्यक्षिक किंवा तोंडी परीक्षा द्यावी लागत असेल किंवा विद्यापीठाची लेखी व महाविद्यालयामार्फत घेतली जाणारी किंवा विद्यापीठ विभागामार्फत घेण्यात येणारी विभागीय अंतर्गत परीक्षा घेतली जात असेल अशा विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे, तोंडी परीक्षेचे किंवा अंतर्गत परीक्षेचे पूर्वीच प्राप्त केलेले मूळ गुण ग्राह्य धरले जातील. विद्यार्थ्यांना श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत फक्त लेखी परीक्षेसाठी पेपरची परीक्षा देता येईल. प्रात्यक्षिक, ओरल, टर्मवर्क इत्यादीसाठी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी बसता येणार नाही. ज्या लेखी पेपरच्या हेडमध्ये तोंडी परीक्षा आहे उदा.एम.ए. इंग्रजी करीता इंग्रजी पेपर क्र.1 ला 80 पैंकीचे गुण व मागील परीक्षेच्या तोंडी परीक्षेचे गुण ग्राह्य धरण्यात येवून निकाल जाहीर करण्यात येईल. तसेच ज्या विषयांना पूर्वी प्रात्यक्षिक परीक्षा नव्हती, त्यांना त्या विषयाच्या एकूण गुणांच्या टक्केवारीत मिळालेल्या गुणांचे रुपांतर करुन गुण देण्यात येतील. तसेच श्रेणीसुधार योजनेतंर्गत ज्या विद्यार्थ्याने नोंदणी करतेवेळी दिलेले उद्दिष्ट पूर्ण झाल्यास त्याला गुणपत्रक पाठविण्यात येईल. परंतु ज्या विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांना लेजरची प्रत पाठविण्यात येईल.

11) श्रेणी सुधार योजने अंतर्गत रीपीटर विद्यार्थ्यांने नाव नोंदणी केलेल्या सर्व विषयांची पुन्हा परीक्षा देणे आवश्यक राहील. मात्र रीपीटर विद्यार्थ्यांस विषयामध्ये सूट पाहिजे असल्यास (विद्यार्थ्याला विषय द्यावयाचा नसल्यास) त्याने परीक्षेसाठी निवडलेल्या/घेतलेल्या विषयामध्ये किमान 50% गुण आवश्यक राहतील. याप्रमाणे विषयांसाठी सूट घ्यावयाची असल्यास विद्यार्थ्यांने तसे लेखी कळविल्यास त्यास विषयात सूट घेता येईल. तसे त्याने परीक्षा अर्ज भरतेवेळी खालीलप्रमाणे नमूद करावे.

मी ---------------------------------------- या महाविद्यालयातून -------------- वर्गाची श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत मार्च/एप्रिल, 200 ला परीक्षा दिली. मला खालील दिलेल्या विषयांमध्ये सूट घ्यावयाची आहे.

| **विषय** | मिळालेले गुण |
|---|---|
| 1) | |
| 2) | |
| 3) | |

विद्यार्थ्याची सही -------------------

प्राचार्याची सही व शिक्का -----------

12) विद्यार्थ्यांनी जुन्या अभ्यासक्रमानुसार पदवी संपादन केली असेल तर विद्यापीठ नियमानुसार जुन्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी संधी उपलब्ध असल्यास त्या संधीनुसार श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत परीक्षा देता येईल. परंतु जुन्या अभ्यासक्रमानुसार संधी संपुष्टात आली असल्यास विद्यार्थ्यांस समकक्ष विषयांचीच परीक्षा द्यावी लागेल किंवा समकक्षता नसल्यास नियमित विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जो अभ्यासक्रम शिकविला जात असेल त्याच अभ्यासक्रमातील विषयाची श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत देणे आवश्यक राहील.

13) श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत निकाल जाहीर करतांना ज्या विषयाची निवड, श्रेणी सुधार करण्यासाठी केलेली आहे, त्या विषयांचे नवीन प्राप्त झालेले गुण (मूळ पदवी प्राप्त झालेल्या वेळी प्राप्त केलेले गुण) ग्राह्य धरुनच श्रेणी सुधार योजनेचा निकाल जाहीर करण्यात येईल.

1) पूर्वी प्राप्त केलेल्या मूळ गुणपत्रकात जर कोणत्याही विषयास अध्यादेशाचा लाभ देण्यात आला असेल तर श्रेणी सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करतांना सदरच्या विषयाचीही पुन्हा परीक्षा देणे बंधनकारक राहील. सदरची अट जनरल नॉलेज या विषयास लागू होणार नाही. तसेच श्रेणी सुधार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांस अध्यादेशाप्रमाणे ग्रेस/कन्डोनेशनच्या गुणाचा फायदा मिळणार नाही.

2) ज्या विद्यार्थ्यांची श्रेणी बदलत नसेल परंतु गुणात वाढ झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांना त्यांनी गुणपत्रकाची मागणी त्याचवेळी केल्यास वाढीव गुणांचे गुणपत्रक देता येईल. मात्र त्याकरीता त्यांना नाव नोंदणी रद्द करण्याबाबतचा हस्तलिखित अर्ज मा.प्राचार्य, यांच्या शिफारशीनुसार सादर करणे आवश्यक राहील. जर अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील संधीमध्ये गुणात वाढ झाली नाही व त्यांनी मागील संधीत गुणात वाढ झाल्याचे गुणपत्रक मागणी केल्यास त्यांना वाढीव गुणाचे गुणपत्रक दिले जाणार नाही. तर अशा विद्यार्थ्यांना त्यांनी नोंदणी करतेवळी जमा केलेले पूर्वीचे गुणपत्रक देण्यात येईल.

3) श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे बक्षीस पदक इत्यादीचा लाभ मिळणार नाही;

4) नाव नोंदणी अर्जासोबत विद्यार्थ्यांने मुळगुणपत्रकात पदवी प्रमाणपत्र आणि पासिंग सर्टीफिकेट इ. विद्यापीठात जमा करावे. विद्यार्थ्यांने पासींग सर्टीफिकेट इ. विद्यापीठात जमा करावे. विद्यार्थ्यांने पासिंग सर्टीफिकेट /पदवी प्रमाणपत्र घेतलेले नसेल तर रु.10/- च्या स्टॅम्प पेपरवर खालीलप्रमाणे मा.कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र (मा.कार्यकारी दंडाधिकारी) यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.

मा.कार्यकारी दंडाधिकारी सो. ----------------- यांचे समोर मी -------------------------------------- सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो की, मी ------------------------------------------ पदवी परीक्षा उत्तीर्ण झालो/झाली आहे परंतु, मी ------------------------------ पदवीचे आजपर्यंत मी विद्यापीठाकडून पदवीप्रमाणपत्र/पासींग सर्टीफिकेट घेतलेले नाही व त्यासाठी अर्जही केलेला नाही.

यातील संपूर्ण मजकूर खरा असून खोटा आढळल्यास मी कायदेशीर शिक्षेस व दंडास पात्र राहील.

विद्यार्थ्याचे नांव ---------------------<br>
विद्यार्थ्याची सही --------------------

मा.कार्यकारी दंडाधिकारी

5) जे विद्यार्थी स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) घेऊन दुस-या विद्यापीठात गेले असतील, त्यांना विद्यापीठाची पात्रता घ्यावी लागेल. त्यासाठी त्यांना नाव नोंदणी करतेवेळी पात्रता अर्ज, पात्रता

. . . 4 . . .

शुल्क इत्यादी पात्रतेच्या नियमाप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल. तथापी संबंधित शैक्षणिक वर्षातील 30 नोव्हेंबर नंतर येणा-या अर्जांना पात्रतेसाठी रु.100/- विलंब शुल्क स्वतंत्र भरावे लागेल व असे अर्ज 25 जानेवारीपर्यंत स्विकारले जातील. ज्या विद्यार्थ्यांनी स्थलांतर प्रमाणपत्र घेतलेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून पात्रतेचा दाखला घेवून नाव नोंदणी अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. महाविद्यालयांनी श्रेणी सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणीचे अर्ज स्विकृत करतेवेळी विद्यार्थ्यांकडून मूळ स्थानांतर प्रमाणपत्र (T.C.) जमा करणे आवश्यक आहे व श्रेणी सुधार झाल्यानंतर महाविद्यालयांनी नवीन स्थानांतर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांस द्यावे व त्यात श्रेणी/गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत असा स्पष्ट उल्लेख करावा.

6) नाव नोंदणी अर्जासोबत विद्यार्थ्यांने खालील नमूना पत्र (Declaration) भरुन देणे आवश्यक आहे.

**नमूना पत्र**

मी ---------------------------------------------- या महाविद्यालयातून --------------------- या वर्गाची श्रेणी/ गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी करीत आहे.

1) मला उत्तीर्ण श्रेणी (पास क्लास) मिळालेली असून ही नाव नोंदणी मी व्दितीय श्रेणी 55% गुण/प्रथम श्रेणी मिळविण्यासाठी करीत आहे.

2) मला व्दितीय श्रेणी मिळालेली असून ही नाव नोंदणी मी 55% गुण /प्रथम श्रेणी मिळविण्यासाठी करीत आहे.

(आवश्यक मजकूर ठेवून बाकीचा मजकूर खोडावा.)

वरीलप्रमाणे माझी श्रेणी/गुणवत्ता सुधार झाल्यासच माझा निकाल जाहीर करुन मला सुधारीत गुणपत्रक देण्यात यावे, अन्यथा मला मिळालेले गुण फक्त कळविण्यात यावे.

विद्यार्थ्यांची सही -------------------
प्राचार्यांची सही व शिक्का-----------
तारीख --------------------------

7) **श्रेणी/गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्र :-**

क) नाव नोंदणी शुल्क, विना विलंब शुल्क (मुदतीनंतर निर्धारीत तारखेपर्यंत) परीक्षा शुल्क, पात्रता शुल्क, त्यांचे विलंब शुल्क (17 व्या कलमाप्रमाणे) इ. चा धनाकर्ष.

ख) पात्रतेचा दाखला.

ग) स्थानांतर प्रमाणपत्र (T.C.)

घ) स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)

च) पदवी प्रमाणपत्र व उत्तीर्ण प्रमाणपत्र (घेतले असल्यास)

छ) ज्या वर्गाची श्रेणी/गुणवत्ता सुधार करावयाची आहे, त्या वर्गाच्या परीक्षेचे मूळ गुणपत्रक दोन प्रमाणित झेरॉक्स प्रतीसह.

ज) प्रतिज्ञापत्र व (Declaration).

वरील नियम व अध्यादेशात सर्व नियम विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील.

तरी मा.प्राचार्य/मा.संचालक/मा.विभाग प्रमुख यांना विनंती करण्यात येते की,सदर प्रकटनाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून त्यात नमूद नियमानुसार नांव नोंदणी अर्ज तसेच परीक्षा अर्ज तपासून नंतर विद्यापीठात पाठवावेत व विद्यापीठास सहकार्य करावे.

जा.क्र.उमवि/7/श्रेणीसुधार/3826/2004,
दिनांक :- 15/10/2004.

**परीक्षा नियंत्रक**